# मुंबई विद्यापीठ

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/४२४ /२०२४

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक आपणा सर्वांना अवगत करण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा/पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/१५२/२०२४ दि. १७ मे, २०२४ अन्वये प्रथम सत्र - २०२४ घेण्यात आलेल्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क **Online** पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येईल असे कळविण्यात आलेले होते; परंतु काही तांत्रिक अडचणीं/त्रुटींमुळे विद्यापीठाने घेतलेल्या खालील नमूद परीक्षांचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतींसाठीचे अर्ज व विहित शुल्क हे पारंपारिक पद्धतीने **(Offline)** खालील नमूद कालावधीमध्ये विहित नमुन्यात संबंधित महाविद्यालयामार्फत प्राचार्याच्या सही व शिक्क्यासह स्विकारण्यात येतील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| SR. NO. | PROG. NO. EXAM | SUBJECT CODE / SUBJECT |
|---|---|---|
| 1 | M.E. (SEM-I) & (SEM-II) (CBCS) (REV) | ALL BRANCHES / SUBJECTS |
| 2 | 1T00628-B.E. (CIVIL) (SEM-VIII) (CBCGS) | 52651-Design & Drawing of Reinforced Concrete Structures |
| 3 | 1T00637-B.E. (CIVIL) (SEM-VII) (CBCGS) | 42071-Design & Drawing of Reinforced Concrete Structures |
| 4 | 1S00916-B.SC. (NAUTICAL SCIENCES) (SEM-VI) (CBSGS) | 17009-Voyage Planning and Collision Prevention-III |
| 5 | B.F.A. & M.F.A. APPLIED ARTS & | ALL SUBJECTS |
| 6 | B.ED. & M.ED. SPL EDUCATION | ALL SUBJECTS |

विद्यापीठाने घेतलेल्या उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतींसाठीचे अर्ज सॉफ्ट कॉपी (पेन ड्राइव) व हार्ड कॉपी स्वरूपात संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यापासून पुढील १२ दिवसांच्या आत तसेच ज्या परीक्षांचे निकाल हे परिपत्रक निर्गमित होण्याअगोदर जाहिर झालेले आहेत अश्या परीक्षांसाठी हे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून पुढील १२ दिवसांच्या आत पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, पहिला मजला, येथे स. ११.०० ते दु. ३.०० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.

वरील प्रमाणेच्या अर्ज उपरोक्त नमूद कालावधी नंतर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही व याबाबत भविष्यात काही प्रशासकीय/तांत्रिक/न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास यांस संबंधित महाविद्यालय जबाबदार राहिल.



Scanned with OKEN Scanner

# मुंबई विद्यापीठ

शुल्काचा तपशील :-

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी **(Those who get concession in tution fees and other fees)** |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुर्नमुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ०१ ऑगस्ट, २०२४

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. केंद्रीय संगणक सुविधा विभागातील सर्व अधिकारी वर्ग
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
५. मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्विय सहायक.



Scanned with OKEN Scanner